# महाराष्ट्र शासन

## मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांचे कार्यालय

वनभवन, उस्मानपुरा, औरंगाबाद ४३१००५ दुरध्वनी क्र.२३४५५०८, फॅक्स क्र.२३३१२०९ ई-मेल-ccftabad@mahaforest.gov.in

### औरंगाबाद वन विभागासाठी करार पद्धतीने सहायक वनसंरक्षक या पदाची पदभरतीसाठी नामिकासुची तयार करणेकरिता जाहिरात

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६ अन्वये औरंगाबाद वन विभागातील ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम या विवक्षित कामासाठी एक सहायक वनसंरक्षक यांची करार पद्धतीने नेमणूक करावयाची आहे. त्यासाठी अहर्ता अनुभव व इतर पात्रता धारण करणारे इच्छुक सेवानिवृत्त सहायक वनसंरक्षक यांनी (जाहिरात प्रसिद्ध झाल्याचा) दिनांक १५-१-२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपवनसंरक्षक, औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद यांचे कार्यालयात विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत.

| | |
|---|---|
| पद | सहायक वनसंरक्षक (ही शासकीय नोकरी नसून, केवळ करार पध्दतीवर ११ महिन्यांसाठी निवड करावयाची आहे.) |
| पद संख्या | ०४ |
| मासिक परिश्रमिक व भत्ते | १. मासिक परिश्रमिक :- नियुक्तीच्या वेळी महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनायेवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून)<br>२. भत्ते : उक्त तरतुदी नुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या जास्तीत जास्त २५ % इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दुरध्वनी भत्ता या सर्व भत्यापोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविलेल्या सोयी सुविधा इत्यादी बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यांत येईल.<br>३. प्रवास भत्ता व दैनिक भत्ता:- करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. |
| पात्रता | शासकीय सेवेतील (गट-अ ग्रेड रु. ७६००/-पेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधुन सहायक वनसंरक्षक या पदावर सेवा केलेल्या सेवानिवृत्त अधिकारी. |
| सविस्तर तपशिल वनविभागाचे www.mahaforest.nic.in या वेबसाईटवर News & Event या वेबपेजवर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी सदर तपशील पाहून अर्ज करावे. | |

स्वाक्षरीत/-
(पी.के.महाजन)
मुख्य वनसंरक्षक(प्रा.)
औरंगाबाद

<u>अर्जाचा नमुना</u>

| पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र |
|---|

प्रति,

मा.मुख्य वनसंरक्षक,
(प्रादेशिक)औरंगाबाद.

विषय : करार पध्दतीने सहायक वनसंरक्षक या पदासाठी नामिका सुची तयार करणेसाठी अर्ज
संदर्भ : दैनिक-----------------------दिनांक ------------------मधील जाहिरात

महोदय,

मी आपली संदर्भिय जाहिरात वाचली असून, माझा वैयक्तिक तपशील खालील प्रमाणे आहे.

१. संपूर्ण नांव :-
२. जन्मतारीख अंकी व अक्षरी :-
३. संपूर्ण पत्ता व मोबाईल / संपर्क क्रमांक / ई-मेल आय डी :-
४. शैक्षणिक पात्रता :
५. अनुभव :- (विषय क्रमांक १ ते १ पैकी) :-
अनुभव विस्तृत नमुद करणेत यावा.
६. वेतनाची किमान अपेक्षा :-
७. शासकीय सेवेत रूजू दिनांक
८. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याचा दिनांक
९. सेवानिवृत्तीच्या वेळचे वेतन :

अर्जासोबत माझ्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने शैक्षणिक पात्रता, जन्म तारीख, सेवा विषयक कागदपत्रे, अनुभव आणि शासन सेवेतील नियुक्ती पासून सेवानिवृत्ती पर्यंतच्या कालावधीत विविध विभागात केलेल्या सेवेचा तपशीलाच्या मुळ प्रतीनुसार प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत. माझी सर्व माहिती सत्य व अचूक आहे. तरी माझी सदर पदासाठी निवड होणेस विनंती आहे.

अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

ठिकाण :
दिनांक :

# मुख्य वनसंरक्षक(प्रा.),औरंगाबाद यांचे कार्यालय

वनभवन, उस्मानपुरा, औरंगाबाद ४३१००५ दुरध्वनी क्र.२३४५५०८, फॅक्स क्र.२३३१२०९ ई-मेल-ccftabad@mahaforest.gov.in

## करार पध्दतीने सहायक वनसंरक्षक या पदाची पदभरतीसाठी नामिकासुची तयार करणेबाबत

उपवनसंरक्षक, औरंगाबाद यांचे अधिनस्त ११ महिन्यांच्या करारावर खालील विषयाकरिता कंत्राटी पध्दतीने पद भरणेकामी जाहिरात आज दि. ०६-०१-२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येत असून सदर पदांसाठी शासकीय सेवेतील (गट-अ गेड रु.७६००/-पेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधुन सहायक वनसंरक्षक या पदावर सेवा केलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी अर्ज करण्याची मुदत दि. १५-१-१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी राहिल. **गट-क व गट-ड संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी आवेदन पत्र दाखल करु नये.**

| अ.क्र | विषय | नामिका सुचीत समाविष्ट करावयाची पदसंख्या |
|---|---|---|
| १ | ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम | सहायक वनसंरक्षक - ४ |

**अर्ज सादर करणेचा कालावधी** :-
दिनांक १५-०१-२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज खालील पत्यावर लिखीत स्वरुपात सादर करणेचे आहेत. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व अनुभवाबाबत योग्य त्या कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित सत्यप्रती जोडाव्यात, मुळ प्रति जोडू नयेत. मुलाखतीचे वेळी मुळ कागदपत्रे दाखवावी लागतील. पदसंख्येच्या १ : ३ प्रमाणात व्यक्तींना मुलाखतीस बोलाविले जाईल.

**अर्ज सादर करणेचा पत्ता** :-
उप वनसंरक्षक, औरंगाबाद यांचे कार्यालय, वनभवन, रेल्वे स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद

**वयोमर्यादा :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर, २०१६ अन्वये करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील. तथापि, ज्या व्यक्तींच्या सेवा त्यानंतर चालु ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्याच्या / प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालु ठेवता येतील मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यांत आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यन्तच कार्यरत राहु शकतील.

**करार पध्दतीने नियुक्तीची कालमर्यादा :-** सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यांत येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त ११ महिन्यांसाठी येईल. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरिता दरवर्षी नुतनीकरण करता यईल. मात्र एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

**सक्षम अधिकारी** :- गट-अ (ग्रेड पे रु. ७६००/-पेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधुन सहायक वनसंरक्षक यांना करार पध्दतीने नियुक्ती देण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधीन नियम ९ (२२) नुसार घोषित करण्यांत आलेल्या विभाग प्रमुखांना (Head of the Department) असतील.